श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

दि.०६ नोव्हेंबर, २०२६

विषय:— खाजगी वातानुकूलीत बस भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

दि. ०१ जानेवारी, २०२७ नुतनवर्षा निमित्त न्यासातर्फे भाविकांना विनामूल्य बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १५ खाजगी वातानुकूलीत बस (२० सीटर बस) भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या **www.siddhivinayak.org** या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. त्याच्या मूल्य दरपत्रकाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

दि. ०१ जानेवारी,२०२७ (नुतनवर्ष)				
अ. क्र.	तपशील	एकूण बस संख्या	प्रति बस दर रुपये	एकूण दर (जीएसटी वगळून)
१	खाजगी वातानुकूलीत बस (२० सीटर बस) डिझेल, वाहनचालक व क्लीनरसह	१५		
			एकूण रक्कम रूपये	

अटी व शर्ती :—

१) शनिवार,दि. २१ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा लाखेने सिलबंद करून प्रतिक्षालयाच्या तळ मजल्यावर टपाल कार्यालयात सादर करावा. ए—४ साईजचे दोन मोठे लिफाफे (एक तांत्रिक लिफाफा व एक मूल्य लिफाफा) लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मूल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे. एका बाजूला दरपत्रकधारकाचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहिण्यात यावे तसेच दुसऱ्या बाजूला श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई, देखभाल व दुरूस्ती विभाग असे लिहावे. मंगळवार, दि.२४ नोव्हेंबर, २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे लिफाफे उघडण्यात येतील.

२) दरपत्रक सादर करताना दरपत्रकात **(BOQ)** नमूदप्रमाणे रक्कम भरावी. दरपत्रकधारकारांनी **BOQ** मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून मूल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

दरपत्रका सोबत जोडावयाची कागदपत्रे

अ) कंपनी नोंदणी दाखला (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट) किमान ३ वर्षापूर्वीचा व्यवसाय असावा.

ब) आयकर नोंदणी पॅन कार्ड

क) जी. एस. टी. नोंदणी दाखला

ड) मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (आय. टी. आर. रिटर्नस आर्थिक वर्ष २०२२—२३,२०२३—२४, २०२४—२५)

इ) अनुभवाचा दाखला दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकीत कंपन्या, शासकीय,निम शासकीय,महानगर पालिका, संस्था तसेच अन्य ठिकाणी दरपत्रकात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम केल्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असावा. (कार्यादेशाची किंवा देयकाची प्रत).

३) दरपत्रकधारक हा हिंदू असावा.

४) ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीतमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय खरेदी उप समितीने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५) दरपत्रकधारकारांनी सर्व **BOQ** मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. डिझेल, वाहनचालक व क्लीनर इ.) मूल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी. सदर रक्कम **GST** वगळून **(Excluding GST)** असावी.

६) रविंद्र नाटय मंदिर ते दादर स्थानक, दादर स्थानक ते रविंद्र नाटय मंदिर याप्रमाणे बससेवेची मार्गीका राहील शुक्रवार पहाटे ५.०० वा. पासून ते .शुक्रवार रात्रौ १२.०० वा.पर्यंत एकूण १९ तास बससेवा सुरू असणार आहे. कंत्राटदाराने वाहनचालक व क्लीनर यांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

७) कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या ड्रायव्हर, क्लिनर/कामगार/मजूर यांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील १९४८ १९२३तरतूदीचे पालन करणे तसेच यासंबंधाने कामासाठी लावणेत येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडंन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतच्या सर्व कायदेशीर तरतूदींचे पालन करणे याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.उक्त सर्व कायद्यातील तरतूदींचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

८) कंत्राटदारामार्फत नेमणूक करण्यात आलेल्या वाहनचालक व क्लीनर कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास अथवा बससेवा सुरू असताना वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. अशा अपघातामुळे समोरील व्यक्ती/वाहन/मालमत्ता अथवा इतर कोणत्याही प्रकारच्या नुकसानीच्या भरपाईची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९) कंत्राटदाराने याकामासाठी नियुक्त केलेल्या पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील. सदर व्यक्तीची न्यासाकडून प्रत्येक बसेसकरीता देण्यात येणाऱ्या कार्डवर, बसेसच्या प्रत्येक फेरीनंतर त्याची नोंद घेऊन त्याकार्डवर उपस्थित न्यास कर्मचाऱ्याची स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी राहील.कार्डमध्ये नोंद घेताना बस ड्रायव्हरचे पूर्ण नाव, बस सुटण्याची वेळ व बस पोहचण्याची वेळ लिहिणे बंधनकारक राहील.

१०) एखादी बस कमी वेळ चालली, अथवा बसमध्ये बिघाड झाल्यामुळे बंद पडली अशा बसचे देयक अदा केले जाणार नाही. बिघाड/नादुरुस्त झालेल्या बसच्या बदल्यात तात्काळ दुसरी बस देणे बंधनकारक राहील.अन्यथा अपूर्णवेळ चाललेल्या बसचे देयक अदा केले जाणार नाही.

११) दरपत्रक भरतांना मूळ दरामध्ये डिझेल, ड्रायव्हर्स, क्लीनर्स व इतर सर्व प्रकारचे खर्च पकडून(**GST** वगळून)दराची रक्कम भरावी. बिलामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा.प्रचलित अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कर कपात केली जाईल.

१२) ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१३) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे.कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.तरी वरील सर्व अटी व शर्तीस अनुसरून आपले दरपत्रक भरण्याचे करावे शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – भ्रमणध्वनी क्रमांक. ९८६७७२०११, कार्यालय दूरध्वनी क्र.०२२–६२४९१११११, ०२२–६२४९१११

(सखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी